| | | |
|---|---|---|
| | विशेष शाखा,पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय<br>ई मेल pisb.pcpc-mh@gov.in<br>दुरध्वनी क्र. ०२० - २७३५०९३७ | |
| जा.क्र./पोउपआ/विशा/जातीय/ ५०२८३८ /२०२३ | | दि. :-०९/११/२०२३ |

**विषय :- महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३३(१) यु प्रमाणे प्रतिबंधात्मक आदेश.**

**आदेश,**

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयामध्ये दिनांक ०९/११/२०२३ पासुन दिनांक १५/११/२०२३ या कालावधीत दिपावली उत्सव साजरा होत आहे.

त्या अर्थी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात दिपावली उत्सवाच्या कालावधीत शांतता व सुव्यवस्था राखण्याचे दृष्टीने दिपावली उत्सवामध्ये देश विघातक व देशद्रोही व्यक्ती शोभेचे दारुकाम उडविण्याचे आड अथवा शोभेचे दारु उडविण्याच्या आवाजाचा फायदा घेवून, असे दारुकाम ज्यामुळे मोठा आवाज किंवा प्रतिध्वनी निर्माण होऊ शकेल या बाबींचा फायदा घेऊन स्फोटक पदार्थांचा स्फोट घडवून, मनुष्याचे जिवीतास, सार्वजनिक मालमत्तेस धोका उत्पन्न होण्याचे संभव आहे असे माझे निदर्शनास आले आहे, आणि तशी माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी, मी विनय कुमार चौबे, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड मला महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३३(१) (यु) प्रमाणे प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी असा आदेश देतो की,

१. कोणत्याही रस्त्यावर किंवा कोणत्याही रस्त्यापासुन ५० फुटाच्या आत कोणतेही फटाके स्वैरपणे उडविणे किंवा दारु काम सोडणे किंवा फेकणे अगर फायर बलुन किंवा अग्नीबाण सोडणे किंवा उडविणे या कृत्यास या आदेशाद्वारे मनाई करीत आहे.

२. एखादा फटाका उडविण्याच्या जागेपासून ४ मिटर अंतरावर १२५ डेसीबल आवाज निर्माण करणाऱ्या फटाक्याचे उत्पादन विक्री व वापरास मनाई करीत आहे.

३. जर साखळी फटाका ५० ते १०० तसेच १०० व त्यावरील फटाके असतील तर आवाजाची मर्यादा फटाका उडविण्याच्या जागेपासून ४ मीटर अंतरापर्यंत अनुक्रमे ११०/११५ व १२५ डेसीबल एवढी असावी. यापेक्षा जास्त आवाज निर्माण करणाऱ्या तसेच १०० पेक्षा जास्त फटाके असलेल्या व १२५ डेसीबल पेक्षा जास्त आवाज निर्माण करणा-या सर्व साखळी फटाका उडविण्यास मनाई करीत आहे.

४. ध्वनी निर्माण करून आवाजाचे प्रदूषण करणाऱ्या फटाक्यावर रात्री २२.०० ते सकाळी ०६.०० वाजेपर्यंत संपूर्ण मनाई करीत आहे.

सदर आदेश दिनांक १०/११/२०२३ चे ००.०१ वा. पासून दिनांक १५/११/२०२३ चे रात्री २४.०० वा. पर्यंत अंमलात राहील.

या आदेशाचे कोणी उल्लंघन केल्यास सदरची व्यक्ती महाराष्ट्र पोलीस अधिनीयम १९५१ चे कलम १३१ प्रमाणे कायदेशीर शिक्षेस पात्र राहतील.

सदरचा आदेश हा माझ्या सही, शिक्क्यानिशी आज दिनांक ०९/११/२०२३ रोजी दिलेला आहे.

९/११

(विनय कुमार चौबे)
पोलीस आयुक्त,
पिंपरी चिंचवड